## UPI बाबत घ्यावयाची माहिती:

तुमच्या खात्यातून पैसे देण्याकरिता फक्त UPI पिन टाका. खात्यातून पैसे जमा करण्याकरिता किंवा पैसे इतरांकडून मिळवण्याकरिता UPI पिन ची आवश्यकता नाही.

पैसे देतांना आपण ज्यांना पैसे पाठवत आहे त्यांचे UPI ID व नाव (Beneficiary Name) तपासावे. पड्ताडणी शिवाय पैसे देउ नका.

मोबाइल ऍपचा (अधिकृत ऍप उदा. Google pay , Phone pay इत्यादी.) हयाच UPI पिन पेजवर फक्त पिन टाकावा. आपले UPI पिन कोणालाही सांगू नका किंवा शेयर करू नका.) मोबाइल एप हे अधिकृत असल्याची खात्री करून घ्यावी.

ज्यांना पैसे द्यावयाचे आहे व पैसे पाठवायचे आहे त्यांचे QR स्कॅन करा . पैसे जमा व मिळवण्यासाठी मात्र QR स्कॅन करावा लागत नाही हे ध्यानात असू द्या.

कोणतेही Screen Shearing व sms forwarding ऍप डाउनलोड करू नका. कोणत्याही अनोळखी व्यक्तीने विचारले असता व त्याची उपयुक्तता समजून घेतल्याशिवाय कोणतेही Screen Shearing व sms forwarding ऍप डाउनलोड करू नका.